MHKO100002732015

**नियमीत दिवाणी दावा क्र. ७२/२०१५**

महंमद साहेबजी मुल्ला वगैरे.
// विरुध्द//
बानूबी अब्दूल मुल्ला वगैरे.

## निशाणी क्र. ४९ आणि ५० खालील आदेश

मयत वादी यांचे वारसांनी प्रस्तुतच्या अर्जांद्वारे मयत वादी क्र.१ व २ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला उशिर माफ होणेसाठी व दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द होऊन मिळणेसाठी विनंती केलेली आहे. प्रतिवादींतर्फे निशाणी क्र.५२ येथे म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द फिल्ड पाडून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शणास येत आहे की, वादी क्र.१ महंमद साहेबजी मुल्ला हे दिनांक २०/०६/२०२० व वादी क्र.२ मौला साहेबजी मुल्ला हे दिनांक ०७/०९/२०१६ रोजी मयत झालेले आहेत व सदरचे अर्ज हे दिनांक २०/१०/२०२२ रोजी दाखल केलेले आहेत. मुदतीचे अधिनियम १९६३ चे आर्टीकल १२० प्रमाणे मयत वादीचे वारसांनी, वादींच्या मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसामध्ये वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. तसेच, मुदतीत वारस अभिलेखावर न घेतल्यास आदेश २२, नियम ४ प्रमाणे तो दावा मयत यांचेविरुध्द दावा अवसान (Abate) होतो. आदेश २२, नियम ४ (५) (ब) प्रमाणे वादी उशिराबाबत संयुक्त कारण दाखवत असेल तर न्यायालयाला विलंब माफ करुन वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देता येईल.

०३. त्याप्रमाणे प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, वादी यांना बराच विलंब झालेला आहे. त्याबाबत वादी यांनी मुदतीचे अधिनियम १९६३ चे कलम ५ प्रमाणे संयुक्त कारण दिलेले आहे का हे पाहणे गरजेचे आहे. वादी यांचे असे कथन आहे की, संपुर्ण महाराष्ट्र राज्यात एप्रिल २०२० पासुन कोवीड-१९ महामारीमुळे संचारबंदी व जमावबंदी लागू करणेत आली होती व सदर महामारीमुळे न्यायालयीन कामात शिथीलता आली होती. तसेच, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा संप असलेमुळे परिवहन यंत्रणा पुर्णतः

कोलमडून पडली होती. त्यामुळे, मयत वादींचे वारसांना त्यांचे वकीलांची वेळेत भेट घेतला आली नाही. सदर कारण व विलंबाचा काळ पाहता मयत वादी यांचे वारसांनी अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तीक कारण नाही. परंतु, प्रकरणाची गुणदोषावर निर्गती करण्याकरीता वादी क्र.१ व २ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणे व अबेटमेंटचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत मयत वादी यांचे वारसांवर अर्जाचा खर्च ठेवून त्याची भरपाई प्रतिवादी यांना देणे योग्य होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

०१. अर्ज (निशाणी क्र.४९ व ५०) रक्कम रु.२,०००/- (रुपये दोन हजार फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहेत.

०२. सदरची खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना पुढील तारखेपर्यंत अदा केलेनंतर वादी क्र.१ व २ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.01.31 17:57:47 +0530

( एस.ए.राठोड )
३रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ३१/०१/२०२३.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S.A.Rathod,<br>2nd Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 31/01/2023 |
| Order signed by P.O. on | 31/01/2023 |
| Order uploaded on | 31/01/2023 |